




# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३२३ वा बुधवार दि १८ मार्च २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# युद्धाची झळ तिरुपतीत! बुलढाणा अर्बन भक्तनिवासातील सेवा ठप्प

**जनसंचलन/बुलडाणा**

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाचे परिणाम आता थेट सर्वसामान्यांच्या जीवनावर उमटू लागले असून बुलढाणा अर्बनच्या तिरुपती येथील भक्तनिवासालाही याचा मोठा फटका बसला आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या युद्धामुळे गॅस, पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा निर्माण झाला असून अत्यावश्यक वस्तूंच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. याच पार्श्वभूमीवर ७ सप्टेंबर २००७ पासून सुरू असलेली आणि दररोज ८०० पेक्षा



अधिक भाविकांच्या जेवणाची व्यवस्था करणारी कॅन्टीन आज १७ मार्च २०२६ पासून बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सुरुवातीला केवळ २५ भाविकांसाठी सुरू झालेली ही सेवा आज मोठ्या प्रमाणात विस्तारली होती. मात्र, गॅस सिलेंडरच्या तीव्र टंचाईमुळे ही सेवा ठप्प झाली आहे. या अचानक निर्णयामुळे भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, बुलढाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक यांनी परिस्थिती लवकर सुधारेल आणि कॅन्टीन पुन्हा सुरू होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा आणि सुरक्षित राहावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## हिवरा आश्रमात गॅस टंचाईचा फटका!

### ३ हजार विद्यार्थ्यांचा स्वयंपाक चुलीवर; महिलांचा जीव धोक्यात




**जनसंचलन/मेहकर**

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या परिणामामुळे गॅस पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला असून त्याची झळ आता थेट ग्रामीण भागाला बसत आहे. मेहकर तालुक्यातील हिवरा आश्रम येथे ही गंभीर परिस्थिती उभी ठाकली आहे. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांनी प्रेरित या आश्रमात सुमारे सहा हजार विद्यार्थी शिक्षण घेतात, त्यापैकी तीन हजार विद्यार्थी गुरुकुलमध्ये निवासी आहेत. व्यावसायिक गॅसचा पुरवठा पूर्णपणे ठप्प झाल्याने या हजारो विद्यार्थ्यांच्या जेवणाची जबाबदारी आता चुलींवर आली आहे. दिवसातून दोन वेळा जेवण बनवताना महिलांना प्रचंड उकाडा आणि धुराचा सामना करावा लागत आहे. वाढत्या तापमानात चुलीसमोर तासन्तास उभं राहणं म्हणजे आरोग्याशी थेट खेळ असल्याची भावना व्यक्त होत आहे. धुरामुळे डोळ्यांची जळजळ, श्वसनाचे त्रास आणि थकवा अशा समस्या महिलांना भेडसावत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचा स्वयंपाक चुलीवर करणं म्हणजे प्रशासनाच्या दुर्लक्षाचा गंभीर नमुना असल्याची टीका होत आहे. -तात्काळ गॅस पुरवठा सुरळीत करण्याची मागणी आता जोर धरत असून, प्रशासन याकडे किती गांभीर्याने लक्ष देते, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

## शेतकऱ्यांच्या वेदनेला आवाज!

### चिखलीत १९ मार्चला सामूहिक उपवास

**जनसंचलन/ चिखली**



विदर्भातील शेतकरी आत्महत्यांच्या काळ्या इतिहासाची सुरुवात मानल्या जाणाऱ्या साहेबराव करपे यांच्या स्मृतीदिनी चिखलीत संतप्त वातावरण पाहायला मिळणार आहे. १९ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर नागरिक अन्नत्याग करून शेतकऱ्यांच्या वेदनांना न्याय देण्यासाठी एकवटणार आहेत. १९८६ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथे साहेबराव करपे यांनी कर्जबाजारीपणा, नापिकी आणि व्यवस्थेच्या उदासीनतेमुळे कुटुंबासह आत्महत्या केली होती. शेतकऱ्याला जगणं कठीण झालंयफ हा त्यांचा आक्रोश आजही तितकाच जिवंत आहे. तीन दशकांनंतरही परिस्थिती बदलली नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे. हा उपवास कोणताही राजकीय कार्यक्रम नसून, बळीराजाच्या वेदनांना आवाज देणारा सामाजिक एल्गार आहे. या वेळी शेतकरी आत्महत्यांवर तीव्र चर्चा आणि सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होण्याची शक्यता आहे. राजकारण विरहित समितीने नागरिकांना जाहीर आवाहन करत एक दिवस शेतकऱ्यांसाठी द्याफ असे सांगितले आहे. आता पाहायचे म्हणजे चिखलीकर किती मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून बळीराजाच्या लढ्याला ताकद देतात!

# उज्ज्वल भवितव्याची हमी...




तो जेमतेम सहा वर्षांचा. मैदानातील काही बॅट चक्क त्याच्या उंचीशी स्पर्धा करीत होत्या. मात्र क्रीझवर गेल्यावर त्याने आपली क्षमता दाखवायला सुरुवात केली. तो खेळपट्टीला चांगलाच चिकटून बसला होता. सहकारी फलंदाज बाद होत असतानाही तो शांत होता. गोलंदाजांचा धैर्याने सामना करीत होता... त्याने नाबाद अर्धशतक केले. त्याचा इंटरव्ह्यू घेण्यास सुरुवात झाली. तो शांतपणे प्रश्नांना उत्तरे देत होता, पण त्याची उत्तरे होती एक एक शब्दाची! तिथेच उपस्थित असलेल्या त्याच्या आजोबांकडे सर्वांची नजर गेली. एवढ्या कमी वयात मुलाला क्रिकेट शिकायला पाठवायचा निर्णय कसा झाला, हा प्रश्न सारेच विचारू इच्छित होते. आजोबांनी शांतपणे सांगायला सुरुवात केली... ङ्गतो बॅटने काय करू शकतो हे आम्ही पाहिले आहे. तो खेळात किती मोठा होईल, किती नाव काढेल हे आम्हाला माहिती नाही. ते त्याच्या नशीबात लिहिलेले असेल. मात्र आम्हाला त्याच्यातील जी गुणवत्ता दिसली तिला साथ देणे, प्रोत्साहित करणे हे आमचे काम आहे. त्यासाठी वेंगसरकर अकादमीपेक्षा अधिक योग्य जागा कोणती असू शकते? सचिन तेंडुलकर दिग्गज होण्यापूर्वी त्यांनी आपले खास स्थान निर्माण केले होते. सर्वोत्तमांकडून शिकला तर आयुष लहान वयात खूप काही साध्य करू शकतो...फ आयुष आणि त्याचे आजोबा लक्ष्मीकांत नाईक यांनी २०१४मध्ये दिलेली ही मुलाखत काही महिन्यांपासून खूपच व्हायरल झाली आहे. आयुषच्या कामगिरीचा सातत्यपूर्ण चढता आलेख हे त्याचे कारण. आयुषची बॅट सातत्याने बोलत होती. त्याची प्रगतीही होत होती. मात्र त्याच्याकडे सर्वसामान्य क्रीडाप्रेमींचे लक्ष वेधले गेले ते आयपीएल पदार्पणातील खेळीने. या सोळा सतरा-वर्षाच्या मुलाबाबत सर्वांना औत्सुक्य होते. मुंबईतील क्रिकेटच्या अभ्यासकांना आयुषच्या क्षमतेची पुरेपूर जाणीव होती. त्याची बॅट कशी खणखणीत बोलते हे ते जाणून होते. चेन्नई सुपर किंग्ज संघातून खेळताना या युवकाने १५ चेंडूत ३२ धावा चोपल्या होत्या. त्याच्या भात्यातील फटके, त्यावरील नियंत्रण, चेंडूला सामोरे जाताना असलेला आत्मविश्वास त्या खेळीतून सर्वांनी अनुभवला होता. आयुषच्या हाती बॅट असली की काय होते, हे आयुषच्या घरच्यांना चांगलेच ठाऊक. त्यांनी जेव्हा पहिल्यांदा याचा अनुभव घेतला तेव्हा त्यांचाही त्यांच्या डोळ्यांवर विश्वास बसला नव्हता. आयुष तेव्हा अडीच वर्षाचा असेल. प्रत्येक आई-वडील आपल्या मुलांसाठी त्या वयात प्लॅस्टिकची बॅट-बॉल घेऊन येतात. घर किवा आजूबाजूचा परिसर मग मैदान होते. अर्थातच मुलाच्या हाती बॅट दिली जाते, आणि त्याला चेंडू टाकण्यास सुरुवात होते. त्या मुलाने फटकावलेला प्रत्येक चेंडू आई-वडिलांच्या चेहऱ्यावर आनंद आणत असतो. आयुषचे वडील योगेश यांनी नालासोपारा येथील बंगल्याच्या आवारात मुलाला चेंडू टाकला. काहीसा उंची दिलेला तो चेंडू आयुषने तडकावला. तो म्हात्रेंच्या बंगल्याच्या आवारातील झाडे पार करून घरात शिरला! तो फटका पाहून आयुषचे वडील, काका, मामा, आजोबा सारेच अवाक झाले होते. आजही तो फटका त्यांच्या डोळ्यासमोर आहे. मग आयुषने काही वर्षांतच मुंबईतील वयोगटाच्या क्रिकेट स्पर्धा गाजवण्यास सुरुवात केली. त्याने काही वर्षांतच उच्च वयोगटाच्याच नव्हे, तर मुंबईच्या संघातही स्थान मिळवले. ते पाहून त्याला ङ्गआयपीएलफ्साठी संधी मिळाली नसती तरच नवल होते. ही संधी त्याला चेन्नई सुपर किंग्जने दिली. तेथील खेळाने सगळ्यांची मने जिंकणाऱ्या, धोनीचे मार्गदर्शन लाभलेल्या आयुषकडे भारताच्या १९ वर्षांखालील संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले. त्याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने इंग्लंड जिंकले. ऑस्ट्रेलियातील मोहीम फत्ते केली. वर्ल्ड कप टी-२० क्रिकेट स्पर्धेची चर्चा सुरू असतानाही भारताच्या १९ वर्षांखालील संघाच्या कामगिरीची, या वयोगटाच्या वर्ल्ड कपमधील भारताच्या कामगिरीची दखल घेतली जात होती, त्याचे प्रमुख कारण कर्णधार आयुष होता. आयुष पाच वर्षाचा असताना त्याचे वडील त्याला जवळच्या क्रिकेट अकादमीत घेऊन गेले आणि मग आयुषच्या कुटुंबियांना आयुषच्या कौतुकाची सवयच करून घ्यावी लागली. हा मुलगा भविष्यात नक्की मोठा क्रिकेटपटू होणार... हा पोरगा शंभर टक्के सोने आहे... पोरगा काय खळतो हो, घरी गेल्यावर त्याची चांगली मीठ मोहऱ्यांनी दृष्ट काढा... असे सतत त्यांच्या कानावर पडू लागले. वसई-विरार पट्ट्यातील क्रिकेट प्रशिक्षण आयुषसाठी पुरेसे नाही, याची जाणीव त्याच्या कुटुंबियांना झाली. त्यांच्या नजरेपुढे आले ते मुंबईतील क्रिकेटपटूंसाठी सर्वांत वंदनीय असलेले वानखेडे स्टेडियम व त्याच्या आसपासची मैदाने. त्यांनी ज्येष्ठ क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांच्याशी संपर्क साधला. वेंगसरकरांनी त्यांची फलंदाजी पाहिली आणि आयुष आठ वर्षाचा झाल्यावर त्याला नक्की घेऊन या, असा सल्ला दिला.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# अशोक चव्हाणांनी नांदेडच्या स्वीकृत सदस्य प्रक्रियेत भाजपच्या निष्ठावंताला दाखवला कात्रजचा घाट

**नांदेड :** नांदेड महानगरपालिकेची पहिली सर्वसाधारण सभा स्वीकृत सदस्यांच्या निवडीवरून चांगली चर्चेत आली. भाजपमधील निष्ठावंत असलेल्या वकील दिलीप ठाकूर यांना शेवटपर्यंत स्थानिक नेत्यांकडून स्वीकृत सदस्यपदासाठी आश्वासित करण्यात आले होते. यादीत त्यांचे नाव असल्याचेही सांगण्यात आले होते. मात्र ऐनवेळी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी त्यांना कात्रजचा घाट दाखवत स्वीकृत सदस्य पदाचा पत्ता कट केला. विशेष म्हणजे त्यांचे समर्थक असलेले माजी नगरसेवक अमित तेहरा यांना संधी दिली. सुरुवातीला स्वीकृत सदस्यांच्या यादीत आपलं नाव असल्याने दिलीप ठाकूर यांनी आनंदाच्या भरात जल्लोषाची तयारी केली होती. बँड लावले आणि शुभेच्छाचे बॅनर देखील तयार केले होते. मात्र ऐनवेळी त्यांना डावलण्यात



आल्याने राजकीय वतुर्ळात चांगलीच चर्चा रंगली.महापालिका निवडणुकीत भाजपने माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वात पहिल्यांदा निवडणूक लढविली होती. तब्बल ८१ पैकी ४५ उमेदवार जिंकून भाजपने पहिल्यांदा म हापालिकेवर सत्ता काबीज केली. महापौर कविता मुळे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेची पहिली सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. सभेदरम्यान भाजपचे पाच, काँग्रेस एक, वंचित एक आणि एमआयएम पक्षाचे एक अशा आठ स्वीकृत सदस्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली. दरम्यान, भाजपने शेवटपर्यंत पाच स्वीकृत सदस्यांचे नाव गोपनीय ठेवले होते. मात्र भाजपचे निष्ठावंत अशी ओळख असलेल्या दिलीप ठाकूर यांचं सुरुवातीपासून नाव चर्चेत होतं. काही दिवसांपूर्वी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी एका कार्यक्रमात दिलीप ठाकूर यांना मोठी जबाबदारी देणार असं आश्वासित देखील केले होते. शिवाय निवड प्रक्रियेच्या सकाळी ११ वाजेपर्यंत त्यांना यादीत नाव आहे, असं भाजपच्या स्थानिक नेत्यांकडून सांगण्यात आले. पण ऐनवेळी माजी नगरसेवक अमितसिंह तेहरा यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.अमितसिंह तेहरा हे अशोक चव्हाण यांचे समर्थक म्हणून ओळखले जातात. ते २०१७ मध्ये काँग्रेसकडून नगरसेवक पदी निवडून आले होते. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण हे भाजपवासी झाल्यानंतर अमितसिंह तेहरा यांनीदेखील भाजपमध्ये प्रवेश केला होता.दुसरीकडे स्वीकृत सदस्यांच्या यादीतून डावलण्यात आल्याने दिलीप ठाकूर हे नाराज झाल्याचे पहायला मिळाले. त्यांनी स्वतःच्या जल्लोषासाठी बँड मागवले होते.

शिवाय शुभेच्छाचे बॅनर तयार केले होते. निष्ठावंताला डावलण्यात आल्याने चर्चेचा विषय बनला होता. विशेष म्हणजे दिलीप ठाकूर यांनी महापालिका निवडणुकीत उमेदवारी दाखल केली होती. मात्र चव्हाण यांच्या आश्वासनानंतर त्यांनी उमेदवारी मागे घेतली. एवढचं नाही तर घरदार सोडून त्यांनी प्रचार सुरु झाल्यापासून ते मतमोजणी होईपर्यंत प्रचार कार्यालयात तळ ठोकून पक्षाचे काम केले होते. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीतही त्यांनी पक्षाचे काम केले. पण शेवटपर्यंत पक्षाने त्यांना झुलवत ठेवले. दरम्यान आपल्याला संधी न मिळाल्याने भाजपमधील निष्ठावंतांमध्ये नाराजी देखील पाहायला मिळाली.

## इंडिया आघाडीत फूट ; राज्यसभा निवडणुकीत 'खेला'

**नवी दिल्ली :** केंद्रातील सत्तारूढ भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) आपली एकजूट राखण्यात यशस्वी झाली असताना काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडी विस्कळीत असल्याचे चित्र राज्यसभा निवडणुकीच्या निमित्ताने निर्माण झाले आहे. एरवी संसदेत विरोधकांची एकी दिसते. परंतु त्यात फूट पडल्याचे सोमवारी दिसून आले.महाराष्ट्रासह दहा राज्यांमधील राज्यसभेच्या ३७ जागांसाठी निवडणुका झाल्या, त्यात २६ जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले. आसाम, महाराष्ट्र, छत्तीसगड, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, तेलंगण आणि हिमाचल प्रदेशमध्ये बिनविरोध निवडणुका झाल्या. ज्येष्ठ नेते शरद पवार , मंत्री रामदास आठवले, अभिषेक मनु सिंघवी, विनोद तावडे आणि बाबुल सुप्रियो यांसारखे प्रमुख नेते विजयी झाले. तथापि जेथे निवडणुकीची वेळ आली असा बिहार, ओडिशा आणि हरियाणामध्ये मतदान झाल्यावर भाजपने आपल्या कार्यपद्धतीनुसार 'खेला' केल्याचे स्पष्ट झाले.मतदान झालेल्या ११ पैकी नऊ जागांवर एनडीएने विजय मिळवला. जाणकारांच्या मते बिहार, ओडिशातील परिस्थिती पाहता शरद पवार यांची उमेदवारी नसती तर महाराष्ट्रातही सातच्या सात जागा भाजपने जिंकल्या असत्या असे मानण्यास पुरेपूर वाव



आहे. बिहारमध्ये काँग्रेसचे तीन आणि राजदचा एक आमदार मतदानासाठी फिरकलाच नाही. परिणामी तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखाली या पक्षाच्या उमेदवाराचा पराभव झाला आणि भाजप आघाडीने सर्व पाच जागा जिंकल्या.ओडिशामध्येही जबरदस्त क्रॉस-व्होटिंग होऊन भाजपने पाठिंबा दिलेले दिलीप राय विजयी झाले. येथे काँग्रेसने आपल्या आमदारांना बंगळूरमधील एका रिसॉर्टमध्ये नेण्यात आले, तरीही क्रॉस-व्होटिंग टाळता आले नाही. हरियाणामध्येही काँग्रेसने आपला उमेदवार निवडून आणण्यात यश मिळवले त्याचे श्रेय केंद्रीय नेतृत्वापेक्षा ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री भूपेंद्रसिंह हुडा यांच्या नेतृत्वाला अधिक जाते. येथे भाजपचा एक उमेदवार आणि काँग्रेसचा एक उमेदवार विजयी झाला.एनडीए आणि इंडिया आघाडी या दोन्हीकडे नसलेल्या आम आदमी पक्ष, बिजू जनता दल, वायएसआर काँग्रेस, बीआरएस आणि बसपा यांसारख्या इतर पक्षांचे ३० खासदार आहेत. राष्ट्रपती नियुक्त खासदारांपैकी रंजन गोगोई निवृत्त झाल्यावर दोन जागा रिक्त आहेत. म्हणजेच राज्यसभेत सत्तारूढ भाजप आघाडीची स्थिती अधिक मजबूत झाली आहे. यावर्षी राज्यसभेच्या आणखी दोन निवडणुका होणार आहेत.

## वीजदर कमी ; दरवर्षी १.२ टक्के घटवणार

**मुंबई :** महावितरणने केलेल्या उपाययोजनांमुळे पुढील पाच वर्षे वीजदर वाढण्याऐवजी दरवर्षी १.२ टक्क्यांनी कमी होतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत दिली. सौरऊर्जेच्या वाढत्या वापरामुळे राज्यातील उद्योगांना, 'सोलर अवर्स'मध्ये (सकाळी ९ ते सायंकाळी ५) वीज वापरल्यास २५ टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.पूर्वी रात्री १२ ते ६ या वेळेत वीज वापरासाठी सवलत दिली जात होती. कारण तेव्हा वीज शिल्लक असायची. मात्र, आता सौरऊर्जेमुळे दिवसा (सकाळी ९ ते सायंकाळी ५) विजेची उपलब्धता प्रचंड वाढली आहे. त्यामुळे राज्य शासनाने धोरण बदलून दिवसा वीज वापरणाऱ्यांना २५ टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. याचा मोठा फायदा उद्योगांना होणार आहे.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने (एमइआरसी) वीज खरेदीच्या अंदाजात आणि भांडवली खर्चात काही तांत्रिक चुका केल्या होत्या. यामुळे महावितरणचे सुमारे ८०,००० कोटी रुपयांचे ऊर्जा शुल्क आणि ५५,००० कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधांचा खर्च नाकारला गेला असता. राज्य शासनाने या चुका आयोगाच्या निदर्शनास आणून दिल्या, ज्यामुळे कंपनीचे मोठे नुकसान टळले आणि ग्राहकांवरील संभाव्य दरवाढीचा भार कमी झाला', असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. महावितरण कंपनीने एक लाख कोटी रुपयांचा वार्षिक महसूलाचा टप्पा पार करून देशातील सर्वांत मोठी कंपनी होण्याचा मान मिळवला आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.कॅप्टिव्ह सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्यांनी जर 'बॅटरी स्टोरेज सिस्टिम'चा वापर केला, तर त्यांना २४ तास सवलतीच्या दरात वीज उपलब्ध होऊ शकते. बॅटरी स्टोरेजचे दर आता २.८० ते २.९० रुपयांपर्यंत खाली आले असून, उद्योगांनी या तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. 'मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनी योजना' आणि पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जात आहे.

# रायगड जिल्हा परिषदेत राजकीय ड्रामा ; निधी वाटपावरून साठमारी, शिंदे गटाच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाची माघार

**रायगड :** रायगड जिल्हा परिषद च्या आगामी अर्थसंकल्पाच्या आराखड्यावरून आज जिल्हा परिषद परिसरात मोठा राजकीय तणाव निर्माण झाला. निधी वाटपावरून विविध पक्षांमध्ये साठमारी सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळाले. दिवसभर चाललेल्या बैठका, आरोप-प्रत्यारोप आणि शिवसेना शिंदे गटाच्या आक्रमक भूमिकेमुळे अखेर प्रशासनाने माघार घेत सर्व संबंधितांना बैठकीत सहभागी करून घेत तोडगा काढला.अर्थसंकल्पीय नियोजनाच्या पार्श्वभूमीवर सकाळपासूनचजिल्हा परिषदेत राजकीय हालचालींना वेग आला होता. भारतीय जनता पार्टी चे नेते आस्वाद पाटील, सतीश धारप, चित्रा पाटील, माजी अध्यक्ष नीलिमा पाटील तसेच गटनेते वैकुंठ पाटील यांनी बैठकीत सहभाग घेतला. त्याचप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस चे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, अमित



नाईक यांच्यासह अन्य पदाधिकारीही उपस्थित होते. या बैठकीत अर्थसंकल्पाचा प्राथमिक आराखडा व विविध विकासकामांच्या तरतुदींवर चर्चा झाली. दरम्यान, शिवसेना शिंदे गटाच्या गटनेत्या मानसी म्हात्रे यांनी आक्रमक पवित्रा घेतला. त्यांनी माजी सभापती दिलीप भोईर, रसिका केणी, अनंत गोंधळी, सचिन राऊळ आणि विघ्नेश माळी यांच्यासह थेट जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांची भेट घेतली. नियोजनाच्या नावाखाली कोणतेही चुकीचे प्रकार सहन केले जाणार नाहीत, असा इशारा देत त्यांनी प्रशासनाला सतर्क केले. त्यानंतर सीईओ नेहा भोसले यांनी तातडीने सर्व विभागप्रमुखांची बैठक बोलावली.यानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या दालनात अनौपचारिक बैठक घेण्याचे नियोजन करण्यात आले. मात्र या बैठकीपूर्वी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजा केणी यांनी आक्रमक भूमिका घेत, ‟बैठकीत आम्हाला स्थान नसेल तर जिल्हा परिषद सदस्यनसलेल्या कोणत्याही बाहेरील पदाधिकाऱ्याला बैठकीत बसू देणार नाही,” असा इशारा दिला. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

प्रशासनाने सुरुवातीला प्रत्येक पक्षाचे केवळ चार प्रतिनिधी बैठकीत घेण्याचा निर्णय घेतला होता. मात्र शिवसेनेचा वाढता दबाव लक्षात घेऊन अखेर सर्व संबंधित पदाधिकाऱ्यांना बैठकीत सहभागी करून घेण्यात आले. त्यानंतर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात झालेल्या बैठकीत अर्थसंकल्पातील तरतुदींवर सविस्तर चर्चा झाली आणि अंतिम आराखड्यावर सहमती झाली. दिवसभर चाललेल्या या घडामोडींमुळे जिल्हा परिषद परिसरात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आपापल्या म तदारसंघांसाठी जास्तीत जास्त निधी मिळवण्यासाठी पक्षांमध्ये चुरस वाढल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगू लागली आहे.


# सोलापूरमधील दुहेरी हत्याकांडाचा उलगडा; प्रॉपर्टीसाठी पुतण्यांनी काका-काकीचा जीव घेतला



**सोलापूर :** सोलापुरात रविवारी महादेव मंचाळ आणि रंगम्मा मंचाळ या वृद्ध पती पत्नीचा संशयास्पदरित्या राहत्या घरी मृतदेह आढळला होता. एमआयडीसी पोलिसांनी कसून तपास करत, या खुनाचा छडा लावला. रंगम्मा मंचाळ आणि म हादेव मंचाळ या दोघा वृद्ध पती पत्नीला सख्ख्या दोन पुतण्यानी ठार केले असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. पोलिसांनी राहुल रामचंद्र मंचाळ (वय २६) आणि विकास रामचंद्र मंचाळ (वय २३ वर्षे)या दोघांना अटक केले आहे. पोलिसांनी राहुल मंचाळ आणि विकास मंचाळ यांना ताब्यात घेत चौकशी केली, पोलिसी खाख्या दाखवताच जागेच्या कारणावरून वृद्ध काका काकीला ठार केले असल्याची धक्कादायक कबुली पोलिसांना दिली आहे.दोघा पुतण्यानी अतिशय थंड डोक्याने वृध्द काका काकीला उशिने तोंड दाबून ठार केले, त्यानंतर अंघोळ केली आणि रवाना झाले.एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद वाघमारे आणि पोलीस निरीक्षक विजय खोमणे यांनी व यांच्या टीमने या खुनाचा छडा लावला आहे.प्रॉपर्टीच्या वादातून अर्धांगवायू झालेले काका महादेव नरसप्पा मंचाळ (वय ६८) व काकू रंगम्मा महादेव मंचाळ (६२, रा. कृष्णानगर, कुमठा नाका सोलापूर) यांचा खून पुतण्यांनीच केल्याचे तपासात उघडकीस आली आहे. राहुल रामचंद्र मंचाळ (२६), विकास रामचंद्र मंचाळ (२३, रा. हैद्राबाद) असे त्या आरोपींची नावे आहेत. महादेव मंचाळ आणि रंगम्मा मंचाळ यांच्या सोबत प्रॉपर्टीच्या वादातून रामचंद्र मंचाळ आणि त्यांची दोन मुलं राहुल मंचाळ आणि विकास मंचाळ यांच्यासोबत नेहमी खटके उडत होते. कुमठा नाका परिसरात असलेल्या कृष्णा नगर येथे असलेली घर जागा पुतणे मागत होते. रंगम्मा मंचाळ आणि महादेव मंचाळ विरोध करतायत याचाच राग मनात धरून पुतण्यानी वृद्ध काका काकीला ठार केले.मंचाळ कुटुंब मोठा कुटुंब म्हणून ओळखला जातो. म हादेव, रामचंद्र, आणि निळकंठ असे तिघे भाऊ. महादेव मंचाळ बीएसएनएल मध्ये शासकीय नोकरीस होते,तर रामचंद्र मंचाळ वन विभागात शासकीय नोकरीला होते. निळकंठ मंचाळ यांना मात्र नोकरी लागली नाही म्हणून नरसप्पा मंचाळ यांनी कृष्णा नगर(सोलापूर ) येथील प्लॉट निळकंठ यांच्या नावावर केली होती. महादेव मंचाळ यांना अपत्य नसल्याने निळकंठ मंचाळ यांनी दोन्ही प्लॉट महादेव व रंगम्मा यांच्या ताब्यात दिले होते. रामचंद्र मंचाळ यांची दोन्ही पोरं घर जागा मागत होते. घर जागेवरून मंचाळ कुटुंबियांत वाद वाढत चालले होते .बीएसएनएल'मधून निवृत्त झालेले महादेव मंचाळ व त्यांची पत्नी रंगम्मा मंचाळ या दोघांचा पुतण्यानी खून केला आहे.राहुल मंचाळ आणि विकास मंचाळ या दोन पुतण्यानी अतिशय थंड डोक्याने शनिवारी मध्यरात्री काका काकीच्या रूम मध्ये शिरले . उशी सदृश म ऊ कापडाने दोघांचे तोंड दाबून त्याचा खून केला.त्याच घरात अंघोळ केली.आणि रात्रीच निघून गेले.मयत महादेव यांचे बंधू निळकंठ मंचाळ यांनी शनिवारी फोन केला असता, फोन उचलला नव्हता.रविवारी सकाळी फोन बंद दाखवला.निळकंठ मंचाळ यांनी ताबडतोब मित्राला कृष्णा नगर येथील घरी पाठविलं आणि हा दुहेरी हत्याकांड उघडकीस आला.एम आय डी सी पोलिसांनी दुहेरी हत्याकांडाचा तपास केला. कौटुंबिक माहिती घेतली असता, भावकित वाद असल्याचे सम ोर आले. संशयित आरोपीचे रामचंद्र मंचाळ हे बालाजी (आंध्रप्रदेश)येथे गेले असल्याची माहिती मिळाली. रामचंद्र मंचाळ यांच्या दोन्ही मुलांना ताब्यात घेण्यासाठी पोलिसांनी रामचंद्र मंचाळ यांना ताब्यात घेतले. मुलांना फोन करून सोलापुरात बोलावले, राहुल मंचाळ आणि विकास मंचाळ सोलापुरात दाखल होताच पोलिसांनी ताबडतोब त्यांना ताब्यात घेतले.सोमवारी दिवसभर सखोल तपास करत, रात्री उशिरा खुनाचा गुन्हा दाखल केला आणि मंगळवारी कोर्टात हजर केले. दुहेरी खुनाचा तपास करण्यात पोलिस निरीक्षक प्रमोद वाघमारे, पोलिस निरीक्षक खोमणे आणि त्यांच्या टीमने विशेष परिश्रम घेतले.

## परीक्षा केंद्रात घुसून विद्यार्थ्यावर हल्ला

**पुणे :** पुण्यात नेमकं चाललंय काय? कधी रस्त्यावर कोयता गँग तर कधी थेट शाळेत कोयता गँग... शहरातील गुन्हेगारी थांबायचं नावच घेत नाही. दिवसेंदिवस कोयत्याचे हल्ले जास्तच थरारक आणि धक्कादायक होत चालले आहेत. सोमवारी (१६ मार्च) पुण्यातील ओतूरमध्ये अशीच एक हादरवून टाकणारी घटना घडली. ज्याने फक्त प्रशासनच नाही तर शिक्षण व्यवस्थेवर आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेवर प्रश्न उभे केले आहेत.ओतूरमधील परीक्षा केंद्रात सोमवारी सकाळी दहावीचा पेपर सुरू होता. त्यावेळी सर्व सुरक्षेचे नियम तोडून एका अल्पवयीन मुलाने थेट वर्गात प्रवेश केला, आणि थेट एका विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला केला. घटना साधारण साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली. विद्यार्थी पेपर लिहित असताना अचानक बाहेरून आलेल्या मुलाने कोणतीही दिरंगाई न करता एका विद्यार्थ्याला लक्ष्य केलं. त्याने मानेवर वार करण्याचा प्रयत्न केला, मात्र संबंधित विद्यार्थ्याने वेळेवर हात पुढे केल्याने वार हातावर बसला आणि मोठा अनर्थ टळला. या हल्ल्यात तो जखमी झाला.घटनेनंतर वर्गात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.



उपस्थित शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी तत्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. जखमी विद्यार्थ्याला त्वरित उपचार देण्यात आले. विशेष म्हणजे, उपचारानंतर त्याने पुन्हा परीक्षा देण्याचा निर्णय घेतला, यासाठी त्याला आवश्यक ती मदत उपलब्ध करून देण्यात आली.प्राथमिक माहितीनुसार, या घटनेमागे पूर्वीचा वाद कारणीभूत असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी वेगाने हालचाल करत मुख्य आरोपीसह आणखी काही जणांना ताब्यात घेतले असून हल्ल्यात वापरलेले शस्त्रही जप्त केले आहे.दरम्यान, हल्ला घडला त्यावेळी वर्गात पर्यवेक्षक उपस्थित नव्हता, ही बाब विशेष लक्षवेधी ठरते. यामुळे परीक्षा केंद्रातील देखरेख व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रवेश प्रक्रियेत अधिक काटेकोरपणा आणण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## जुना वाद, निपाणी तांड्यावर दोन गटामध्ये तुंबळ हाणामारी ; वृद्ध शेतकरी, गरोदर महिलेलाही बेदम मारहाण

**बीड :** बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील निपाणी जवळका तांडा येथे जुन्या वादातून दोन गटांत तुंबळ हाणामारी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी १७ जणांविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या हल्ल्यात ७५ वर्षीय वृद्ध शेतकरी दामोधर हरीभाऊ राठोड यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील महिला आणि एका सात महिन्यांच्या गरोदर महिलेलाही निर्दयीपणे मारहाण करण्यात आल्याने परिसरात संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी दामोधर राठोड (वय ७५) हे आपल्या म ुलीच्या घरासमोर बसलेले होते. यावेळी गावातीलच पापा रोहीदास चव्हाण, रमेश रोहीदास चव्हाण, उमेश रोहीदास चव्हाण, पिंटू सुर्यभान चव्हाण यांच्यासह अन्य काही जण मद्यधुंद अवस्थेत त्या ठिकाणी आले. नऊ महिन्यांपूर्वी झालेल्या एका घटनेचा आणि जुन्या भांडणाचा राग मनात धरून या टोळक्याने दामोधर राठोड यांना विनाकारण शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.राठोड यांनी विचारणा केली असता, आम्ही तुमचा एक माणूस मारला आहे, आता तुला आणि तुझ्या नातवालाही जिवंत सोडणार नाही,' अशी धमकी देत आरोपींनी हल्ला चढवला. यावेळी आरोपींनी दगड, लाकडी दांडे आणि कुऱ्हाडीचा वापर करून दामोधर यांना बेदम मारहाण केली.भांडणाचा आवाज ऐकून दामोधर यांची म ुलगी शांताबाई, सून यशोदा, नात शिवकन्या आणि नातू निलेश हे सर्वजण भांडण सोडवण्यासाठी धावून आले. मात्र, आरोपींनी





त्यांनाही लक्ष्य केले. विशेष म्हणजे, फिर्यादी यांची नात प्रियंका चव्हाण ही सात महिन्यांची गरोदर असतानाही तिला रमेश चव्हाण याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच शिवकन्या चव्हाण हिला मारहाण करून तिचे कपडे फाडून विनयभंग केल्याचा गंभीर आरोपही फिर्यादीत करण्यात आला आहे.या घटनेनंतर दामोधर राठोड यांनी गेवराई पोलीस ठाण्यात धाव घेऊन आपबिती सांगितली. त्यांच्या तक्रारीवरून पापा चव्हाण, रमेश चव्हाण, उमेश चव्हाण, पिंटू चव्हाण, अशोक चव्हाण, ज्ञानेश्वर चव्हाण, आनसाबाई चव्हाण आणि रोहीदास चव्हाण यांच्यासह एकूण १७ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

हे प्रकरण परस्परविरोधी असल्याने पोलिसांनी दोन्ही बाजूंची दखल घेतली असून, गेवराई पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## संगमनेरमध्ये सहावीच्या मुलीवर ॲसिड हल्ला, थरकाप उडवणारी घटना

**अहिल्यानगर :** संगमनेरमध्ये अतिशय संतापजनक घटना समोर आली आहे. इयत्ता सहावीच्या विद्यार्थीनीवर अज्ञात आरोपीने थेट ॲसिड हल्ला केला आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. अवघ्या ते दहा ते बरा वर्षाच्या मुलीवर अशाप्रकारे हल्ला झाल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. ही विद्यार्थिनी शाळा सुटल्यानंतर आपल्या घरी जात होती. आपल्यावर अशाप्रकारे हल्ला होईल? असं तिला कधीही वाटलं नव्हतं. पण अचानक एका नराधमाने तिच्यावर थेट ॲसिड हल्ला केला. या हल्ल्यात तिच्या चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली आहे. या घटनेनंतर शाळेत शिक्षण घेणाऱ्या चिमुकली मुलीदेखील सुरक्षित नाहीत का? असा प्रश्न या निमि



त्ताने उपस्थित होत आहे.संगमनेर तालुक्यात पुन्हा एकदा मानवतेला काळीमा फासणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. वडगाव पान परिसरात शाळा सुटल्यानंतर घरी परतणाऱ्या अवघ्या पाचवी-सहावीतील अल्पवयीन विद्यार्थिनीवर अज्ञात व्यक्तीने ॲसिड फेकून हल्ला केला. या अमानुष प्रकारामुळे संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. दुपारी सुमारे दोन वाजेच्या सुमारास ही घटना घडली. शाळेतून घरी जात असताना अचानक हल्लेखोराने मुलीवर ॲसिड फ ेकल्याची माहिती समोर येत आहे. हल्ल्यानंतर मुलीने आरडाओरडा केल्याने परिसरातील नागरिक तत्काळ धावून आले. त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती देत मुलीला उपचारासाठी लोणी येथील खासगी रुग्णालयात दाखल केले.अल्पवयीन मुलीवर असा अमानुष हल्ला करणाऱ्या नराधमाला तात्काळ अटक करून कठोर शिक्षा द्यावी. सदर विद्यार्थिनी गंभीर जखमी असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. या क्रूर आणि निर्घृण हल्ल्यामुळे संगमनेर तालुक्यात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. अल्पवयीन मुलीवर असा अमानुष हल्ला करणाऱ्या नराधमाला तात्काळ अटक करून कठोर शिक्षा द्यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.पोलिसांनी अज्ञात आरोपीचा शोध सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत आहे. हल्लेखोर तरुण असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. लवकरच आरोपी पोलिसांच्या ताब्यात येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या घटनेने पुन्हा एकदा महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

# रमजानच्या महिन्यात मृत्यूचा तांडव, पाकिस्तानने केलेल्या काबूलवरील हवाई हल्ल्यावर रशीद संतापला





**मुंबई :** अफगाणिस्तानातील तालिबान सरकारने आरोप केला आहे की, पाकिस्तानने काबूलमधील एका व्यसनमुक्ती रुग्णालयावर केलेल्या हवाई हल्ल्यात किमान ४०० लोक ठार झाले आणि सुमारे २५० जण जखमी झाले. पाकिस्तानने हे आरोप स्पष्टपणे नाकारले असून, या हल्ल्यांमध्ये कोणत्याही नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य केले गेले नसल्याचे म्हटले आहे. तालिबान सरकारचे प्रवक्ते झबिहुल्ला मुजाहिद यांनी सांगितले की, काबूलच्या पोलीस जिल्हा ९ मध्ये असलेल्या व्यसनमुक्ती केंद्रावर हल्ला करण्यात आला, ज्यात रुग्णालयाचा मोठा भाग उद्ध्वस्त झाला. त्यांनी पुढे सांगितले की, मृत आणि जखमींपैकी बहुतेक जण उपचारासाठी दाखल झालेले रुग्ण होते. अफगाण क्रिकेटपटू रशीद खान आता यावर व्यक्त झाला आहे.

काही महिन्यांपूर्वी, अफगाण क्रिकेटपटूंनी काबूलमधील त्याच रुग्णालयाला भेट दिली होती, ज्यावर पाकिस्तानने बॉम्बहल्ला केला होता, आणि जीवनाची दुसरी संधी मागणाऱ्या रुग्णांशी संवाद साधला होता, आणि आज पाकिस्तानी हवाई हल्ल्यांमध्ये त्यापैकी शेकडो जण ठार झाले. उपचाराची प्रक्रिया एका दुःखद शोकांतिकेत बदलली. अफगाणिस्तानचा स्टार क्रिकेटपटू, रशीद खान याने या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले. त्यांनी सोशल मीडियावर लिहिले, 'काबूलमध्ये पाकिस्तानी हवाई हल्ल्यांमुळे झालेल्या नागरिकांच्या जीवितहानीच्या ताज्या वृत्तांनी मला तीव्र दुःख झाले आहे.

नागरिकांची घरे, शैक्षणिक संस्था किंवा वैद्यकीय सुविधांना लक्ष्य करणे, मग ते हेतुपुरस्सर असो वा अपघाताने, हा एक युद्ध गुन्हा आहे.'मानवी जीवनाबद्दलची अशी उघड बेपर्वाई, विशेषतः रमजानच्या पवित्र महिन्यात, घृणास्पद आणि अत्यंत चिंताजनक आहे. यामुळे केवळ फूट आणि द्वेष वाढेल. मी संयुक्त राष्ट्र आणि इतर मानवाधिकार संस्थांना आवाहन करतो की त्यांनी या ताज्या अत्याचाराची सखोल चौकशी करावी आणि गुन्हेगारांना जबाबदार धरावे. या कठीण काळात मी आमच्या अफगाण लोकांसोबत उभा आहे. आम्ही या धक्क्यातून सावरू आणि एक राष्ट्र म्हणून पुन्हा उभे राहू. आम्ही नेहमीच असे केले आहे. इन्शाअल्लाह!'अफगाणिस्तानचे माजी कॅप्टन मोहम्मद नबी यांनीही या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले. त्यांनी एका पोस्टमध्ये लिहिले, 'आज रात्री काबूलमधील एका रुग्णालयात आशेची ज्योत विझली. उपचारासाठी आलेल्या तरुणांना पाकिस्तानी लष्करी राजवटीने केलेल्या बॉम्बहल्ल्यात ठार मारण्यात आले. माता दारात उभ्या राहून आपल्या मुलांची नावे पुकारत होत्या. रमजानच्या २८ व्या रात्री त्यांचे प्राण अकाली हिरावले गेले.'अफगाण सरकारचे प्रवक्ते झबिहुल्ला मुजाहिद यांनी या हल्ल्याचा निषेध केला. पाकिस्तानने अफगाण हवाई हद्दीचे उल्लंघन करून काबूलमधील एका व्यसनमुक्ती केंद्राला लक्ष्य केले, असे ते म्हणाले. या हल्ल्यात उपचार घेत असलेल्या अनेक लोकांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले, असे त्यांनी सांगितले. त्यांनी या घटनेला मानवतेविरुद्धचा गुन्हा म्हटले.

## भारत वर्ल्ड कप जिंकण्याचं एकमेव कारण म्हणजे आयपीएल : पान्टिंग

**मुंबई :** यंदाच्या टी-२० कपच्या विजेतेपदाच्या ट्रॉफीवर भारतीय क्रिकेट संघाने आपले नाव कोरले. भारताची ही तिसरी ट्रॉफी असून सर्वाधिक टी-२० वर्ल्ड कप जिंकणारा भारत एकमेव देश आहे. विशेष म्हणजे आपल्या घरच्या मैदानावर विजेतेपदाची ट्रॉफी अजूनही कोणत्याच देशाच्या संघाने जिंकलेली नाही. भारतीय संघाच्या कामगिरीचे जगभरात कौतुक होत आहे. अशातच ऑस्ट्रेलियाचा यशस्वी कर्णधार म्हणून ओळखला जाणाऱ्या रिकी पॉन्टिंगने भारताच्या यशाचं कारण सांगताना, आयपीएलमध्ये खेळण्याचा फायदा होत असल्याचं म्हटलं आहे.आताचा भारतीय संघ हा संतुलित आणि बॅटिंगही खोलवर आहे. फक्त टी-२० नाहीच मागील पाच ते सहा आयसीसी टूर्नामेंटमध्ये भारताने दमदार कामगिरी केली आहे. टी-२० वर्ल्ड कप सुरू होण्याआधीच ओळखलं होतं की भारतीय संघात खोली आणि ताकद पाहता त्यांच्याकडे किती अनुभव आहे. भारतीय खेळाडूंना दबावाच्या परिस्थितीमध्ये खेळण्याचा अनुभव खूप जास्त आहे. आताच्या संघातील खेळाडूंमध्ये किती अनुभव आहे याच्याकडे सर्वांचं कमी लक्ष दिलं जातं. तो अनुभव आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा असो किंवा फक्त आयपीएलचा, असं रिकी पॉन्टिंग म्हणाला.आयपीएलचे सामने हे एखाद्या आंतरराष्ट्रीय सामन्यांसारखे मोठे आणि दबावाखाली होतात. त्यामुळे भारतीय खेळाडूंना तिथेच मोठ्या मंचावर खेळण्याचा अनुभव आणि सवय होऊन जाते, असंही पॉन्टिंगने म्हटलं आहे. 'द आयसीसी रिव्ह्यू'च्या कार्यक्रमामध्ये पॉन्टिंग बोलत होता.

दरम्यान, भारताने २०२३ पासून आयसीसीची प्रत्येक स्पर्धा भारताने गाजवली आहे. कारण वन डे वर्ल्ड कप २०२३ चा अंतिम सामना आणि टी-२० वर्ल्ड कप २०२६ मधील सुपर ८ मध्ये आफ्रिकेविरूद्धचा सामन्यात भारताचा पराभव झाला आहे. हे दोन सामने सोडता भारतीय संघाने प्रत्येक सामन्यात बाजी मारली आहे.

## पहिल्यापासून IPL गाजवणारे पाच दिग्गज घेऊ शकतात निवृत्ती, मराठमोळ्या खेळाडूचाही समावेश..

**ढाका :** भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज ईशांत शर्माने आयपीएलमध्ये एकूण सात संघाकडून प्रतिनिधित्व केले आहे. ईशांतचे आंतरराष्ट्रकीय करियर जवळपास संपले आहे. २०२१ पासून तो टीमच्या बाहेर असून आता युवा गोलंदाजांच्या स्पर्धेत तो यंदा आयपीएल खेळणं थांबवू शकतो. ईशांत आता गुजरात टायटन्स संघामध्ये असून त्याचे वय ३७ आहे. भारताकडून त्याने १०५ कसोटी सामन्यांमध्ये ३११ विकेट घेतल्या आहेत. भारताच्या अनेक ऐतिहासिक विजयाचाही तो साक्षीदार राहिला आहे.मराठमोळा खेळाडू अजिंक्य रहाणेसुद्धा या यादीमध्ये असू शकतो. आयपीएलच्या पहिल्या सीझनपासून खेळणाऱ्या अजिंक्यने १९८ आयपीएल सामन्यांमध्ये १२५.०२ च्या स्ट्राईक रेटने ५०३२ धावा केल्या आहेत. १०५ ही त्याची सर्वोच्च धावसंख्या राहिली आहे. २०२३ मध्ये चेन्नईकडून खेळताना त्याने दमदार कमबॅक केले होते, गेल्या म्हणजेच २०२५ साली त्याच्याकडे कोलकाता नाईट रायडर्स संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले होते. पण काही खास कामगिरी करता आली नाही. त्यावेळी पॉइंट टेबलमध्ये संघ आठव्या स्थानावर राहिला होता. त्यामुळे ३८ वर्षीय रहाणेचाही हा शेवटचा सीझन असू शकतो.परदेशी खेळाडूंमधील वेस्ट इंडिज संघाचा ऑल राऊंडर खेळाडू सुनील नरेनचा हा अखेरचा सीझन असू शकतो. आयपीएलमध्ये नरेन याने १९२ विकेट आपल्या नावावर केल्या असून १७८० धावा केल्यात. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून त्याने निवृत्ती घेतली आहे. चौथा खेळाडू म्हणजे






ऑस्ट्रेलियाच मिचेल स्टार्क असून कोलकाता संघासाठी २०२४ च्या विजेतेपदामध्ये महत्त्वाची भूमिक बजावली होती. याआधीच स्टार्कने टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली असल्याने ३६ वर्षीय स्टार्कही आयपीएल खेळायचं थांबवू शकतो.पाचवा खेळाडू महेंद्रसिंग धोनी असून सीएसकेमध्ये संजू सॅमसन याला संघात घेतल्याने माहीचा शेवटचा सीझन असल्याचं बोललं जात आहे. २५ वर्षाचा धोनी प्रत्येक आयपीएल सीझनमध्ये आता निवृत्त होणार अशी चर्चा होते पण तो संघात कायम असून खेळतोच यंदाही तो खेळणार असल्याचं सीएसकेच्या सीईओंनी सांगितलं होतं. त्यामुळे धोनी हा सीझन खेळून थांबू शकतो.

## काव्या मारनने इशानकडे सोपवली सनरायझर्स हैद्राबादच्याय संघाची धुरा..

**मुंबई :** इशान किशन सध्या त्याच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये आहे. या २७ वर्षीय खेळाडूने टी-२० विश्वचषकात उत्कृष्ट कामगिरी केली, जिथे त्याच्या कामगिरीमुळे भारताला विजेतेपद मिळवण्यात मदत झाली. प्रथम अव्वल फळीतील फलंदाज म्हणून आणि नंतर संजू सॅमसनच्या संघात पुनरागमनानंतर तिसऱ्या क्रमांकावर खेळताना त्याने शानदार कामगिरी केली. आता त्याला कर्णधार पदाची जबाबदारी मिळू शकते.टीम इंडियाचा डावखुरा फलंदाज ईशान किशन आयपीएल हंगामातसनरायझर्स हैदराबादचेकर्णधारपद भूषवू शकतो. झरीं उींाळपी संघात कधी सामील होईल हे अद्याप स्पष्ट नसल्यामुळे, तो कर्णधारपदासाठी आघाडीवर आहे. टाइम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, सूत्रांनी सांगितले की एसआरएच व्यवस्थापनाने या विषयावर चर्चा केली आहे आणि ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज कमिन्सच्या अनुपस्थितीत कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारण्यासाठी इशानला सर्वात योग्य उमेदवार मानले जात आहे. या हंगामात



अभिषेक शर्मा इशानचा उपकर्णधार असेल.इशानने आयपीएलमधील सर्वात स्फोटक यष्टीरक्षक-फलंदाजांपैकी एक म्हणून स्वतःला स्थापित केले आहे. सनरायझर्स हैदराबादसह तीन फ्रँचायझींकडून खेळताना, या स्पर्धेत ११९ सामन्यांमध्ये त्याने ११२ डावांमध्ये २९.१० च्या सरासरीने आणि १३७.६४च्या स्ट्राइक रेटने २,९९८ धावा केल्या आहेत. त्याच्या एकूण धावांमध्ये एका शतकाचा, १७ अर्धशतकांचा समावेश असून, त्याने २८८ चौकार आणि १३४ षटकार मारले आहेत. इशान किशनने यष्टीमागे ५९ झेल आणि पाच यष्टीचीत करूनही योगदान दिले आहे. लिलावात ११.२५ कोटींना विकत घेतल्यानंतर २०२५ चा हंगाम हा त्याचा पहिला हंगाम होता. त्याने १४ सामन्यांमध्ये १५२.५८ च्या स्ट्राइक रेटने ३५४ धावा केल्या, ज्यात एक शतक आणि एका अर्धशतकाचा समावेश आहे.

टी२० विश्वचषक २०२६ मधील त्याच्या कामगिरीबद्दल बोलायचे झाल्यास, तो भारताचा दुसरा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. त्याने नऊ डावांमध्ये ३५.२२ च्या सरासरीने आणि १९३ पेक्षा जास्त स्ट्राइक रेटने ३१७ धावा केल्या. त्याच्या या खेळीत तीन अर्धशतकांचा समावेश होता, त्यापैकी एक अर्धशतक अंतिम सामन्यात झळकवून त्याने भारताला विजेतेपद मिळवून देण्यात मदत केली.

# अत्यंत अश्लील बोल, बीभत्स डान्स..; नोरा फतेहीच्या गाण्यावरून वाद, हटवण्याचे



**मुंबई :** नोरा फतेही आणि संजय दत्त यांच्यावर चित्रित केलेल्या 'सरके चुनर तेरी सरके' या गाण्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. 'केडी- द डेविल' या कन्नड चित्रपटातील हे गाणं प्रदर्शित झाल्यापासून त्यावर बरीच टीका होत आहे. या गाण्याचे बोल आणि त्यावरील कोरिओग्राफी अत्यंत अश्लील असल्याचा आरोप केला जात आहे. या आरोपांनंतर आता 'नॅशनल ह्युमन राइट कमिशन'ने (राष्ट्रीय मानवाधिकार आयोग) नोटीस बजावली असून त्यानंतर युटयूब आणि इतर प्लॅटफफॉर्म्सवरून हे गाणं काढून टाकण्यात आलं आहे. एएनआय या वृत्तसंस्थेनं दिलेल्या माहितीनुसार, वकील विनीत जिंदाल यांनी सेन्सॉर बोर्ड आणि माहिती व प्रसारण मंत्रालयाकडे गाण्याविरोधात औपचारिक तक्रार दाखल केल्यानंतर गाण्याला आणखी विरोध होऊ लागला. वकिलांनी या गाण्याविरोधात तातडीने कारवाई करण्याची मागणी केली होती.ङ्घहे गाणं अत्यंत अश्लील, बीभत्स अभिव्यक्तींनी भरलेलं आहेङ्घ, अशा शब्दांत वकील जिंदाल यांनी टीका केली होती. असं असूनही हे गाणं सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. या गाम्याचे बोल अत्यंत आक्षेपार्ह आणि सार्वजनिकदृष्ट्या प्रदर्शनासाठी अयोग्य आहे, हे गाणं विशेषत: अल्पवयीन म ुलांसाठी अत्यंत अनुचित आहे, अशी बाजू त्यांनी तक्रारीत मांडली होती. त्यांच्या तक्रारीत गीतकार रकीब आलम, दिग्दर्शक प्रेम, संगीतकार अर्जुन जान्या आणि गायिका मंगली यांचा समावेश होता. मिळालेल्या माहितीनुसार, या गाण्यासंदर्भात दिल्ली पोलिसांच्या सायबर सेलकडे यापूर्वीच एक स्वतंत्र फौजदारी तक्रार दाखल करण्यात आली होती. आनंद ऑडिओकडून हे गाणं हिंदी, मल्याळम, तमिळ, तेलुगू आणि कन्नड अशा विविध भाषांमध्ये युट्यूबवर अपलोड करण्यात आलं होतं. सोमवारी हे गाणं सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाल्यानंतर त्याचे बोल आणि कोरिओग्राफी पाहून अनेकांनी तीव्र संताप व्यक्त केला होता. आता तक्रारीनंतर हे गाणं सर्व प्लॅटफफॉर्म्सवरून काढून टाकण्यात आलं आहे.एएनआय' या वृत्तसंस्थेशी बोलताना अभिनेत्री आणि खासदार कंगना राणौत यांनी गाण्यावर आणि बॉलिवूडवर टीका केली आहे. ङ्घअश्लीलता, लक्ष वेधून घेण्यासाठी केलेले डावपेच याबाबतीत बॉलिवूडने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. संपूर्ण देश त्याचा निषेध करत आहे आणि त्यांना धारेवर धरत आहे. पण मला वाटत नाही की त्यांच्यात कसली लाज उरली आहे. अशा प्रकारच्या अश्लीलता आणि बीभत्सतेबाबत आणखी कडक भूमिका घेण्याची गरज आहे. कुटुंबासोबत टीव्ही पाहणंही आता कठीण झालं आहे. बॉलिवूडवर आता कडक जरब बसवावी लागेलङ्घ, असं त्या म्हणाल्या.

***

# शाहरुख खान पुन्हा करणार रोमान्स

**मुंबई :** शाहरुख खान पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर रोमान्सची जादू पसरवण्यासाठी सज्ज झाले आहेत. अलीकडील वृत्तानुसार, 'किंग' चित्रपटानंतर किंग खान एका मोठ्या बजेटच्या रोमँटिक चित्रपटात दिसू शकतात. विशेष म्हणजे, या चित्रपटात त्यांचा लूक खूप वेगळा आणि विंटेज शैलीचा असेल, जो प्रेक्षकांसाठी एक नवीन अनुभव घेऊन येईल. पिंकविलाच्या वृत्तानुसार, हा चित्रपट क्लासिक लव्ह स्टोरीवर आधारित असेल, ज्यात भावना आणि जुन्या काळातील भावनांना आधुनिक स्पर्श देऊन सादर केले जाईल. निर्माते हा प्रकल्प मोठ्या स्तरावर बनवण्याची तयारी करत आहेत, जेणेकरून प्रेक्षकांना एक भव्य सिनेमॅटिक अनुभव मिळू शकेलरिपोर्टनुसार, शाहरुख या चित्रपटात एका परिपक्क आणि सखोल भूमिकेत दिसणार आहेत. त्यांचा हा अवतार त्यांच्या जुन्या रोमँटिक प्रतिमेची आठवण करून देईल, जी प्रेक्षकांना 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे', 'कुछ कुछ होता है' आणि 'वीर-झारा' सारख्या चित्रपटांमध्ये खूप आवडली होती. दीर्घकाळानंतर ते या प्रकारात परत येत असल्याने, चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे.चित्रपटाची कथा, दिग्दर्शक आणि इतर स्टारकास्टबद्दल सध्या जास्त माहिती समोर आलेली नाही, परंतु इंडस्ट्रीमध्ये या प्रोजेक्टबद्दल चर्चा तीव्र झाली आहे. निर्माते या चित्रपटाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रमोशन करण्याची योजना आखत आहेत.विशेष म्हणजे, शाहरुख खानने गेल्या



काही वर्षांत 'पठाण' आणि 'जवान' सारख्या ॲक्शन चित्रपटांम ुळे बॉक्स ऑफिसवर शानदार पुनरागमन केले आहे. आता ते पुन्हा त्यांच्या रोमँटिक अंदाजात परत येणार आहेत, जो त्यांच्या कारकिर्दीची ओळख आहे.

जर सर्व काही योजनेनुसार झाले, तर हा चित्रपट येत्या काळात बॉलिवूडमधील सर्वात चर्चेत असलेल्या आणि बहुप्रतिक्षित चित्रपटांपैकी एक ठरू शकतो. चाहत्यांना आता या चित्रपटाच्या अधिकृत घोषणेची प्रतीक्षा आहे.


# 'मी घरी एकटी असताना एक माणूस थेट बाल्कनीतून आत शिरला'

**मुंबई :** नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'सायको सैयां' या शोमुळे चर्चेत असलेली अभिनेत्री तेजस्वी प्रकाशने एक भयानक अनुभव शेअर केला आहे. एका व्यक्तीनं तिचा पाठलाग केला आणि ती घरी एकटी असताना तो तिच्या घरात घुसला होता, अशी घटना अभिनेत्रीनं सांगितली आहे. शोशा'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये तेजस्वी प्रकाश म्हणाली, 'एक माणूस रोज माझ्या घरी येत असे. मी एका 'रो-हाऊस'मध्ये राहते, त्यामुळे तिथे एक अंगण आहे, तो तिथेच ती पत्रे टाकून जायचा. जेव्हा जेव्हा मी घराबाहेर पडायचे, तेव्हा मला ती पत्रे दिसायची आणि 'हा कोण असावा?' असा प्रश्न मला पडायचा. आम्ही अत्यंत हुशारीनं घरात कॅमेरे बसवून घेतले होते, पण तरीही तो आमच्या हाती लागला नाही.'जेव्हा तेजस्वी घरी एकटी होती, तेव्हा तो माणूस बाल्कनीतून थेट घरात घुसला. तेजस्वी पुढे म्हणाली, 'एक दिवस मी घरी एकटी असताना तो थेट बाल्कनीतून आत शिरला. सुदैवाने त्याचवेळी माझी आई आणि ड्रायव्हर तिथे आले आणि त्यांनी त्याला बाल्कनीतच पकडले. करणने त्याला हँडल केलं आणि नंतर त्याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.'दरम्यान, करण कुंद्रा आणि तेजस्वी प्रकाश यांची प्रेम कहाणी २०२१ मध्ये, 'बिग बॉस १५' या रिॲलिटी शोदरम्यान सुरू झाली होती. करण आणि तेजस्वी नुकतेच 'ङ्रींसहींशी उहशष डशरीप ३' मध्ये एकत्र दिसले होते. त्याचबरोबर करणच्या छातीवर तेजस्वी प्रकाशचा असलेला एक टॅटू दिसल्यामुळे चाहते थक्क झाले होते. मात्र, 'हिंदुस्तान टाइम्स'ला दिलेल्या एका मुलाखतीत करण म्हणाला की, हा टॅटू दिसायला जरी आकर्षक असला, कायमस्वरूपी नव्हता. सुरभी चांदना आणि तेजस्वी प्रकाश नुकत्याच एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आल्या होत्या. त्यांच्या आगामी 'सायको सैयां' या वेब सीरिजच्या प्रमोशन कार्यक्रम ादरम्यान हा वाद निर्माण झाला.

# देवाला वाहिलेलं 'फुल' मातीमोल होताना कुणीच कसं पाहिलं नाही? अस्वस्थ करणाऱ्या वास्तवाची 'फुला'

**मुंबई :** वाघ्या-मुरळीच्या पारंपरिक लोकसंस्कृतीची गोष्ट सांगणाऱ्या फुला या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. अभिनेता सुबोध भावेच्या धीरगंभीर आवाज असलेल्या टीझरने नेटकऱ्यांचं लक्ष वेधलं आहे. येत्या १७ एप्रिल रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. आटपाडीतील काही तरुणांनी एकत्र येऊन केलेल्या या वेगळ्या धाटणीचा चित्रपटाने आता उत्सुकता निर्माण केली आहे. पैलवान अजित शिवाजी जाधव यांनी 'फुला' या चित्रपटाची निर्मिती केली असून शिवशर्विल मूव्ही आणि बोधी सिनेमा यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे.फुला' ही एका मुरळीच्या पोटी





जन्मलेल्या निरागस मुलीची संघर्षमय कथा आहे. तमाशा फड, जागरण गोंधळ या पारंपरिक सांस्कृतिक पटावर आधारित ही गोष्ट महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतून आकार घेते. साखळदंडानी बांधलेली, जमिनीवर आडवी झालेली, आजुबाजूला हळद पडलेली अशी फ्रेम, सुबोध भावे यांच्या आवाजात यत्र नार्यस्तू पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता या संस्कृत ओळींनी सुरू होणारा टीझर लक्ष वेधून घेतो. त्यानंतर एका मागोमाग एक देखण्या दृश्यप्रतिमांतून या चित्रपटाचा पोत कसा असेल याचा अंदाज बांधता येतो. एका मुलीच्या अस्तित्वावर निर्माण होणारा समाजाचा प्रश्न हा या चित्रपटातून मांडला जाणार आहे. या टीझरवर नेटकऱ्यांनी विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत.या चित्रपटाची कथा अभिषेक जावीर यांची असून दिग्दर्शनही त्यांचंच आहे. तर चित्रपटाची पटकथा रवीकिरण जावीर यांनी लिहिली आहे. समाधान ऐवळे यांनी संगीत दिग्दर्शन, अमर देवकर यांनी सर्जनशीर दिग्दर्शन, रवीकिरण जावीर, समाधान ऐवळे यांनी गीतलेखन, प्रताप जोशी यांनी छायांकन, निर्मिती रचना अतुल लोखंडे यांनी केली. राहुल प्रजापती यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे. वैशाली सामंत, वैशाली माडे, रोहित राऊत, रवींद्र खोमणे, वैशाली कुलकर्णी, वैष्णवी आदोडे, आकाश नवगिरे यांनी चित्रपटातील गाण्यांना आवाज दिला आहे. तर नृत्य दिग्दर्शन आशुतोष कीर्तिकर आणि सृष्टी जाधव यांचे आहे. वेशभूषाकार कोमल जावीर, अक्षता पाटील असून रंगभूषाकार समाधान भोरे यांनी काम पाहिले आहे.


# जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमाची राज्य सेवा हक्क आयोगाकडून दखल...

**जनसंचलन/बुलढाणा**

शासनात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी विकसित केलेल्या सहज प्रणाली आणि महसूल मित्र या उपक्रमांची राज्य सेवा हक्क आयोगाने विशेष दखल घेतली आहे. या उपक्रमांचे कौतुक करत, हा बुलढाणा पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू करण्याची महत्त्वपूर्ण शिफारस आयोगाने राज्य सरकारकडे केली आहे.

मुंबई येथे पार पडलेल्या राज्य सेवा हक्क आयोगाच्या ३१ व्या बैठकीत डॉ. किरण पाटील यांनी या प्रणालींचे सादरीकरण केले. यावेळी मुख्य सेवा हक्क आयुक्तांनी या उपक्रमांची प्रशंसा करत, यामुळे आणि सेवा हक्क कायद्याची उद्दिष्टे प्रभावीपणे साध्य होत असल्याचे नमूद केले. महसूल मित्र: हा एआय () आधारित व्हॉट्सअॅप द्विभाषिक (मराठी व इंग्रजी) चॅटबॉट आहे. यात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत येणाऱ्या विविध सेवा, आवश्यक कागदपत्रे आणि प्रक्रिया यांची माहिती एका क्लिकवर मिळते. विशेष म्हणजे, यात सुविधेसह जमीन विषयक कायदे आणि वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळतात. सहज प्रणाली: १८५० पासूनचे दुय्यम निबंधक कार्यालयातील खरेदी-विक्रीचे दस्तऐवज या प्रणालीद्वारे संगणकीकृत करण्यात आले आहेत. नागरिक ऑनलाइन द्वारे शुल्क भरून क्यूआर कोड ( ) असलेले प्रमाणित दस्तऐवज घरबसल्या डाऊनलोड करू शकतात. यामुळे कार्यालयांचे हेलपाटे वाचणार आहेत. तक्रार निवारणासाठी जीपीएसचा वापर : या प्रणालीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अवैध वाळू उपसा किंवा इतर महसूल विषयक तक्रारी नोंदवण्यासाठी यात जीपीएस () आधारित यंत्रणा विकसित करण्यात आली आहे. तसेच विधी सहाय्य, मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, आपलं सरकार सेवा केंद्र आणि आधार केंद्रांची माहितीही या चॅटबॉटवर उपलब्ध आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या तंत्रस्नेही उपक्रमामुळे सामान्य नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचणार असून, लवकरच ही प्रणाली राज्यभर लागू झाल्यास महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख होण्यास मदत होईल.

# सेफ्टी टँक मध्ये मृतमुखी गाईला एकनिष्ठा गौ सेवकांनी जेसीबी द्वारे काढले बाहेर



**जनसंचलन/ खामगांव**

दिनांक १७ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता येथील साई नगर मधील सोसायटीचा मागील भागातील सेफ्टी टँक मध्ये अंदाजे १० ते १२ दिवसा पासून एक गौ माता मृतमुखी कुजलेल्या अवस्थेत पडलेली होती. परिसरात सर्वत्र दुर्गंध पसरलेला होता घटनेची माहिती पत्रकार नाना हिवराळे यांनी एकनिष्ठा गौ सेवा फाउंडेशनला देताच सुरजभैय्या यादव, ईश्वर इंगळे, गजानन सोनोने, युवराज मोरे, गजानन गावत्रे आधी गौ सेवकांनी साई नगर वाडी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली असता गाईचे प्रेत कुजलेल्या अवस्थेत सेफ्टी टँकच्या मलब्याखाली तरंगत होते. गौ सेवक सुरजभैय्या यादव व ईश्वर इंगळे यांनी ग्रामविकास अधिकारी रविंद्र जनार्दन कांबळे यांना फोनद्वारे संपुर्ण माहिती दिली व त्यांना घटनास्थळी लगेच बोलावून पाहणी करून त्यांनी सेफ्टी टँकचा मलबा तोडण्यासाठी पुढाकार घेत एकनिष्ठा गौ सेवकांना परवानगी देताच जेसीबीच्या सहाय्याने गाईचे प्रेत बाहेर काढून अंतिम संस्कार करून भावपुर्ण श्रद्धांजली दिली. ज्या सोसायटी मध्ये राहणाऱ्या पाच घरातील लोकांचा वापर या सेफ्टी टँक वर आहे त्यांना कायदेशीर नोटीस देऊन त्यांच्यावर योग्य कार्यवाही करावी अशी विनंती सुरजभैय्या यादव यांनी केली जर सेफ्टी टँक वरचा झाकन उघडा नसता तर मुक्या निष्पाप गाईचा जीव गेला नसता अशी प्रतिक्रिया गौ सेवकांनी दुःख व्यक्त करत कांबळे यांना सांगितली अशी माहिती ईश्वर इंगळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

# ऐशियन लेक्रॉस स्पर्धेत विजेत्या भारतीय संघाचे केंद्रिय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले स्वागत

**जनसंचलन/बुलढाणा**


ऐशियन लेक्रॉस स्पर्धेत भारताला सुवर्ण पदक मिळवुन देणाऱ्या भारतीय संघाचे केंद्रिय आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी स्वागत केले असुन भारतीय संघात सहभागी झालेल्या सागर बोर्डे यांचा प्रातिनीधीक स्वरुपात सत्कार केला.

साऊदी अरब येथील रियाद येथे १ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान ऐशियन लेक्रॉस स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये भारतीय संघामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथील सागर बोर्डे सहभागी झाला होता. त्यांच्या संघाने इराक विरुध्द झालेल्या शेवटच्या सामन्यामध्ये ९-२ फरकाने विजय मिळवत भारताला ऐशियन लेक्रॉस स्पर्धेत अजिंक्य पद मिळाले. या संघामध्ये देशभरातुन १८ खेळाडु सहभागी झाले होते. विजेत्या चमुचे केंद्रिय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी स्वागत केले असुन प्रातिनीधीक स्वरुपात मेहकर येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात संघातील खेळाडु सागर बोर्डे यांची नुकत्याच सत्कार केला.

# बुलढाणा जिल्हा कारागृहात हॅपी थॉट्स कार्यक्रम; २८८ बंद्यांचा सहभाग

**जनसंचलन/बुलढाणा**

बंदीजनांच्या मानसिक सबलीकरण व सकारात्मक परिवर्तनाच्या उद्देशाने बुलढाणा जिल्हा कारागृहात तेजज्ञान फाऊंडेशन, पुणे यांच्या वतीने हॅपी थॉट्स कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी बंद्यांना प्रेरणादायी पुस्तके वितरित करण्यात आली. या उपक्रमाला एकूण २८८ बंद्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हा उपक्रम कारागृह व सुधारसेवा अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई, तसेच पूर्व विभाग नागपूरचे कारागृह उपमहानिरीक्षक वैभव आगे यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कारागृह बुलढाण्याच्या अधिक्षक मेघा शंकर बाहेकर या होत्या. यावेळी तेजज्ञान फाऊंडेशनचे शिवाजी जवरे, डॉ. अजय खर्चे, देवन भोपळे, राजेंद्र ढोंडगे, संतोष मलये, निलेश सोनोने, ज्योती सोनोने व रश्मी खर्चे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुभेदार दरेसिंग चव्हाण, हवालदार संजय मदारकर, विजय गवळी, शिपाई संदीप राजपुत, सुरेश गुळवे, महिला शिपाई आश्विनी भालके तसेच कारागृहातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.



# चहाचा साथीदार पार्ले-जी थांबला! खामगावातील शिवांगी बेकर्सचा प्लांट बंद ५०० कामगारांवर बेरोजगारीचे सावट

**जनसंचलन/ खामगाव**

सर्वसामान्यांच्या चहाच्या कपासोबत जुळलेले बिस्कीट म्हणजे . पण याच लोकप्रिय बिस्किटाच्या उत्पादनाला आता बुलढाणा जिल्ह्यात ब्रेक लागला आहे. गॅसच्या तीव्र टंचाईमुळे खामगाव येथील शिवांगी बेकर्सफ या कारखान्यातील उत्पादन गेल्या ११ मार्चपासून पूर्णपणे ठप्प झाले असून तब्बल ५०० कामगारांच्या रोजगारावर टांगती तलवार निर्माण झाली आहे. आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या परिणामांचा फटका आता थेट स्थानिक उद्योगांना बसू लागल्याचे चित्र आहे. खामगाव येथील शिवांगी बेकर्स ही कंपनी देशभरात प्रसिद्ध असलेल्या बिस्किटांचे उत्पादन करते. मात्र व्यावसायिक गॅसच्या पुरवठ्यावर आलेल्या मर्यादांमुळे कंपनीला आवश्यक असलेला गॅस मिळत नसल्याने उत्पादन प्रक्रिया पूर्णपणे थांबवावी लागली आहे. या कारखान्यात दररोज सुमारे ८० टन बिस्किटांचे उत्पादन केले जात होते. त्यामध्ये जवळपास ६० टन ग्लुकोज बिस्किटे तर २० टन क्रीम बिस्किटे तयार केली जात होती. मात्र बिस्किट तयार करण्यासाठी लागणारे ओव्हन पूर्णपणे गॅसवर चालत असल्याने गॅस पुरवठा खंडित होताच संपूर्ण उत्पादन बंद पडले आहे. कंपनीचे संचालक अभय अग्रवाल यांनी सांगितले की, आमचा प्लांट ११ मार्चपासून बंद आहे. कारखान्यासाठी दररोज सुमारे ३ टन गॅसची आवश्यकता असते. मात्र गॅस मिळत नसल्यामुळे दोन्ही उत्पादन लाईन थांबल्या आहेत. आमच्याकडे सुमारे ५०० कामगार काम करतात, त्यामुळे उत्पादन लवकर सुरू झाले नाही तर कामगारांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळण्याची भीती आहे. दरम्यान, बिस्किट उत्पादन ही अत्यावश्यक सेवेशी संबंधित उद्योग असल्याने प्रशासनाने तातडीने गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी कंपनी व्यवस्थापनाकडून करण्यात आली आहे. अन्यथा खामगावातील या महत्त्वाच्या उद्योगावर गंभीर परिणाम होऊन शेकडो कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# राम कथेचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा - राधेश्यामजी चांडक

**जनसंचलन/बुलडाणा**




सद्भावना सेवा समिती द्वारा दिनांक ७ एप्रिल ते १५ एप्रिल पर्यंत भव्य संगीतमय राम कथेचे आयोजन करण्यात येत आहे. अयोध्या येथील साध्वी सृष्टीलता रामयणीजी आपल्या अमृतमय वाणीतुन श्रीराम कथा प्रस्तुत करणार आहे. या संदर्भात नुकतीच कथेच्या नियोजनासाठी महिलांची सभा संपन्न झाली. या सभेत महिलांमध्ये प्रचंड उत्साह दिसुन आला व अनेक सुचना प्राप्त झाल्या. कथेचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा असे आवाहन राधेश्याम चांडक यांनी केले.विद्यार्थी रामकथे मध्ये यावे यासाठी महिलांनी विविध सुचना केल्या. विद्यार्थी व पालक सर्वांना संस्काराची गरज आहे व आजची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांसाठी प्रशोत्तरी, बक्षीस वितरण असे उपाय करण्यात येईल. पालकांनी आपल्या पाल्यांना कथा मंडपात पाठवावे असे आवाहन भाईजींनी केले. उन्हाळा असल्याने डोमचा भव्य मंडप व कुलरची व्यवस्था लहाने ले-आऊटच्या ग्राऊंडवर करण्यात आली आहे. ७ एप्रिलला सकाळी ९ वाजता गणेश मंदीर सुवर्णनगर पासुन शोभा यात्रा प्रारंभ होवुन शहरातील संगम चौक, जयस्तंभ चौक, महावीर चौक, मेनरोड, बुलडाणा अर्बन, दुर्गा माता मंदीर, भारतमाता चौक व पेठेतील राम मंदीरा पर्यंत जाईल. विविध देखावे, दिंड्या शोभा यात्रेत राहील. समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सभेत मार्गदर्शन केले. सभेमध्ये किरण वर्मा, मिनाक्षी वर्मा, गिता शर्मा, मंजु शर्मा, अश्विनी वाईकर, मनिषा शर्मा, माया शर्मा, आरती शर्मा, कु. शुभांगी चंदन, रुपा शर्मा, अंजली परांजपे, हंसा शर्मा, मनिषा बाहेती, सपना अग्रवाल, प्रिती अग्रवाल, जमना शर्मा यांची उपस्थिती होती. सदभावना सेवा समितीचे कार्याध्यक्ष चंपालाल शर्मा, सचिव प्रा. प्रकाशचंद्र पाठक, कोषाध्यक्ष तिलोकचंद चांडक, सुरेशचंद्र गट्टाणी आदींची उपस्थिती होती. आभार प्रदर्शन व सुत्रसंचालन लाला माधवाणी यांनी केले.

# बिबट्याला शोधायला वाघच मैदानात!

## मध्यरात्री धाडसी मोहीम, जीव धोक्यात घालून शोध पोलीस-वनविभागाला तात्काळ माहिती जळगाव जामोद जागा झाला एका फोनवर

**जनसंचलन/ जळगाव जामोद**



शहरात काल मध्यरात्री बिबट्याच्या प्रवेशाने भीतीचे सावट पसरले. रात्री साधारण २:२० वाजण्याच्या सुमारास जिल्हाप्रमुख गजानन वाघ यांना नगरसेवक पती जहीर यांचा घाबरवून टाकणारा फोन आला ङ्कभाऊ, तुमच्या घराजवळ बाग (बिबट्या) घुसला आहे!फ्फ क्षणाचाही विलंब न करता गजानन वाघ तात्काळ घराबाहेर पडले. त्याचवेळी समीर आर्यन, सोहेब भाऊ, तंजीर भाऊ व त्यांच्या मित्रपरिवाराने जीवाची पर्वा न करता अंधारातच बिबट्याचा शोध सुरू केला. रात्री ३ वाजताच पोलीस प्रशासन आणि वनविभागाला घटनेची माहिती देण्यात आली. तसेच सोशल मीडियावरील सर्व ग्रुप्सवर सतर्कतेचे संदेश पाठवून नागरिकांना सावध करण्यात आले. एकीकडे शहर झोपेत असताना दुसरीकडे हा थरारक शोधमोहीम सुरू होती. परिस्थिती अशी निर्माण झाली होती की ङ्कबिबट्याला वाघ शोधतोयफ्फ अशीच चर्चा परिसरात रंगली. मात्र, चतुर बिबट्याने सर्वांना चकवा देत अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला. बिबट्याच्या या अचानक हालचालीमुळे जळगाव जामोद शहरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांमध्ये दहशत आहे. वनविभागाची संपूर्ण टीम घटनास्थळी दाखल झाली असून बिबट्याला पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. नागरिकांनी सतर्क राहावे, रात्री बाहेर पडणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, गजानन वाघ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दाखवलेल्या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या सतर्कतेमुळेच वेळेत प्रशासनाला माहिती मिळून मोठा अनर्थ टळल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८